जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२८५/२०२१

प्रेसनोट

दिनांक -२८/४/२०२१

हिजवडी वाहतुक विभाग हद्दीतील डांगे चौक येथे स्प्र.क्र. २५ ताथवडे गावठाण पासुन जीवननगर मार्गे सर्व्हे नं ९९ ते १०० पुनावळेकडे जाणारा (सर्व्हिस रस्ता) २४.०० मी. रुंद रस्ता विकसीत करण्याचे अंतर्गत नविन पावसाळी पाण्याची गटार लाईन टाकणेकरीता मुंबई पुणे हायवे लगत असलेल्या पुर्व बाजुचा सर्व्हिस रस्ता ११०० मीटर लांबी व ७ मीटर रुंद व रस्त्याचे लेवलनुसार खाली खोदकाम करुन ९०० एमएम सिमेंट कॉक्रीटचा पाईप टाकण्याचे काम करणार आहेत.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ,भा.पो.से. पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**हिंजवडी वाहतुक विभाग अंतर्गत**

१. पुनावळे अंडरपास कडुन सर्व्हिस रोडने ताथवडे अंडरपासकडे जाणरी वाहने अंडरपास कडे न जाता हायवेला लागुन ताथवडे अंडरपासचे समोरील बाजुस जावुन यु टर्न घेवुन ताथवडे अंडरपास कडे जातील

२. पुनावळे गावाकडुन सर्व्हिस रोडने येणारी वाहने मेन हायवेवर वळविण्यात येईल तसेच ताथवडे अंडरपास येथुन पुनावळेकडे सर्व्हिसरोडने जाणारी वाहने ताथवडे गावाकडुन किंवा मेन हायवेचे पश्चिम बाजुचे सर्व्हिस रोडने ईच्छित स्थळी जातील.

वरील आदेश दि.२९/०४/२०२१ पासुन ९० दिवसाकरीता वैद्य राहील.

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वाहतूक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Shreemath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी <u>हिंजवडी</u> वाहतुक विभाग

४) कार्यकारी अधिकारी, स्थापत्य ,ड क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.